**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २३/२०१९** **दिनांक १९/०३/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/०३/२०१९ ते १९/०३/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून २४/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३/०३ | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | १८/०३ | १९/०३ | | २०/०३ | २१/०३ | २२/०३ | २३/०३ | २४/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३०.२ | ३१.६ | ३२.२ | ३१.६ | ३१.० | ३५.६ | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३१ | ३१ | ३१ | ३४ |
| १७.६ | १८.२ | १९.२ | १४.४ | १७.८ | १८.० | १६.४ | किमान तापमान (अं.से) | १९ | १९ | १८ | १८ | १९ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | ० | ० | ० | ० |
| ७६ | ६९ | ७० | ५१ | ८३ | ६६ | ७३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ४४ | ५८ | ४५ | ४२ | ३१ |
| ३८ | ४० | ४१ | ३९ | ४४ | ३० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २१ | २७ | २५ | २५ | २१ |
| ३.४ | ३.७ | ४.९ | ५.८ | २.६ | ३.० | ३.७ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ५ | ५ | ६ | ७ |
| शांत | नै.द. | नै.द. | वा.प. | शांत | आ.द. | शांत | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै. | नै.प. | पू. | ई.उ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २० ते २४ मार्च,२०१९ पर्यंत वाऱ्याचा वेगात वाढ होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पोटरी अवस्था | • भात पिक पोटरी अवस्थेत असल्याने शेतामध्ये पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. पर्यत ठेवावी. |
| भुईमुग | शेंगा अवस्था | • भुईमुग पिकावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण किंवा ०.२ टक्के मॅन्कोझेब किंवा ०.१ टक्का कार्बेन्डाझीम यापैकी एका बुरशीनाशकाची फवारणी १० दिवसांच्या अंतराने तीन वेळा करावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था | • आंबा पिकामध्ये भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>• तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| चिकू | फुलोरा | • तापमानात वाढ संभवत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा. |
| केळी | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, केळी बागेत आठवडयातून दोन वेळा पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.<br>• फुलोऱ्यावर आलेल्या केळीच्या झाडाला काठीचा आधार द्यावा.<br>• केळी पिकामध्ये पर्णगुच्छ रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगग्रस्त झाडे मुनव्यासकट जमिनीतून समूळ उपटून नष्ट करावीत. पर्णगुच्छ रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होत असल्याने, किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच ०.०५ टक्के डायमिथोएट या कीटकनाशकाची १५ दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारणी करावी.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या केळी बागेत काठीचा आधार द्यावा. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • उन्हाळी भेंडी पिकाचे तुडतुड्यापासून नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी फोरेट १० जी १० किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात झाडाभोवती मातीत मिसळावे. किडग्रस्त शेंडे/ पाने नष्ट करावीत. शेतामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा.<br>• टोमॅटो, वांगी, मिरची पिकावर पांढरी माशी, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मि.ली. किंवा डायमेथोएट १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**
**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**